माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /५७५१/२०२३/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे १

| पिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| श्री. सुनिल खंडु शिंगाडे | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बिरोबावाडी, ता. दौंड,जि. पुणे | विस्तार अधिकारी, (कृषि) पंचायत समिती दौंड, ता. दौंड, जि. पुणे |

**( सुनावणी दिनांक- ०६/०५/२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. १५/०९/२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती देणे नाकारले, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ०८/०५/२०२३ | सन २०१६ ते २०२० मधील ग्रामपंचायत बिरोबावाडी, ता. दौंड जि. पुणे या ग्रामपंचायतीने शौचालय अनुदान, करिता दिलेले न.नं. ८ चे उतारे, वाटपाचे स्थळ व फोटोची प्रत इ. माहिती |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर केले आहे. सदर निवेदनात दिलेली माहिती खोटी, अपुरी व दिशाभूल करणारी आहे. जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाचे पालन केले नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना शास्ती शुल्क आकारण्याची विनंती आयोगाकडे केली आहे.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बिरोबावाडी, ता. दौंड यांनी अपिलार्थीस दि. ०१/०७/२०२३ रोजी माहिती दिल्याचे आयोगासमोर अवगत केले.

उपलब्ध अभिलेखावरुन, अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाल्याचे दिसून येते.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ /५७५१/२०२३/पुणे /7907/2025

दिनांक - 21/11/2025